सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे ४११००१

दुरध्वनी क्र. (०२०)२६१२२८४६ / ४७ comm.urban@gmail.com

जा.क्र.ना.बँका/सआ-१/तिरुपती अर्बन बँक/कलम ३५/२०२५ /3011 दिनांक 27/ ११ /२०२५

**R.P.A.D./ Hamdast**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३५(१) अन्वये सुनावणी नोटीस**

**प्रति,**

अध्यक्ष / उपाध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी, - **अर्जदार**
तिरुपती अर्बन को-ऑप बँक मर्या.
१७२, श्रद्धानंद पेठ, दक्षिण आंबाझरी मार्ग, नागपूर १०.

**विरुद्ध**

सोबत जोडलेल्या "परिशिष्ट अ" येथील - **गैरअर्जदार**
यादीप्रमाणे ३५३० इतके बँकेचे सभासद

**विषय :- <u>सभासदत्व रद्द करणेबाबत</u>**
**तिरुपती अर्बन को-ऑप बँक मर्या. नागपूर**

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

तिरुपती अर्बन को-ऑप बँक लि. या बँकेने दि.०७/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनिमय १९६० चे कलम ३५ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम २९ अन्वये बँकेचे एकुण ३५३० सभासदांचे सभासद रद्द करण्याबाबत वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव करुन, त्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

तरी याबाबत "परिशिष्ट अ" येथील नमूद सर्व ३५३० सभासद व बँक यांना कळविण्यात येते की, सदर प्रकरणी या कार्यालयामध्ये मा.अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेसमोर **दि.२३/१२/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता** सुनावणी निश्चित करण्यात आलेली आहे.

तसेच सदर सुनावणी नोटीस मुख्य कार्यकारी अधिकारी, तिरुपती अर्बन को-ऑप बँक मर्या. यांनी सोबत जोडलेल्या यादीमधील ३५३० सभासदांना बजावून, त्याबाबतची पोहोच पावती सुनावणीवेळी या कार्यालयास सादर करावी.

तसेच याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सदर सुनावणीस आपण व यादीमधील नमूद सभासदांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करावे. सदर दिवशी सुनावणीस उपस्थित न राहिल्यास एकतर्फी निर्णय घेण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांवर राहिल याची नोंद घ्यावी.

**मा.अपर आयुक्त**
**यांचे मान्यनतेने**

(राजेंद्र खंडाईत)
उपनिबंधक, सहकारी संस्था (ना.बँका)
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत** :- स्वीय सहाय्यक, मा.अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

Sec 35 Tirupati Urban Bank

Scanned with OKEN Scanner